संदर्भ- १) म.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव यांचे आदेश क्रमांक साप्रवि/आस्था-४/ आरआर/ ३८४, दि.२२/५/२००१.
२) शासन अधिसुचना दि.२४/५/९९ नुसार विहीत महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सुधारणा) नियम १९९९.
३) म. विभागीय आयुक्त नाशिक यांचेकडील पत्र क्र.विकास/कार्या-१९/जि.प. आस्था/५९८३४/०९ दि.८/१०/२००९
४) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. एस. आर. व्ही-२०११/प्रक्र. २८४/१२ दि.२१/१०/२०११
५) शासन परिपत्रक क्रमांक सेवाजे-२००८/प्र.क्र.३९/आस्था-१० दिनांक ३१ मार्च २०१७
६) मा.मु.का.अ.जि.प. जळगाव कडील अधिकार प्रदान क्र साप्रवि/आस्था-४/७७/२०१७ दि.१७/०५/२०१७
७) शासन अधिसुचना सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.२८१/बारा दिनांक २१ जून २०२१
८) शासन ग्राम विकास विभाग, पत्र क्र. संकिर्ण-५०२३/स.क्र.१६७/आस्था-१० दि.३१/१०/२०२३
९) मा.मु.का.अ.जि.प. जळगाव कडील पत्र क्र. साप्रवि/आस्था-९/com.no.४९१११२/२०२४ दि.१०/०७/२०२४

---

**आदेश**

क्र. साप्रवि/आस्था-९/आरआर/४२/२०२५
सामान्य प्रशासन विभाग, जि.प. जळगांव.
दिनांक:२७/०१/२०२५

उपरोक्त संदर्भ क्र २ व ५ अन्वये महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेशोत्तर परिक्षा) नियम १९८५ अनुसार दिनांक २४.०५.१९९९ च्या अधिसुचनेपुर्वी नियुक्त जिल्हा परिषद कर्मचा-यांच्या सेवा जेष्ठता निश्चित करणेसाठी मार्गदर्शक सविस्तर सुचना दिलेल्या आहेत. त्यानुसार सन १९९९ च्या नियमाव्दारे १९८५ च्या सेवा प्रवेश नियमातील नियम ५ (३) मध्ये (ज्यात सेवेतुन काढुन टाकण्याची तरतुद होती) सुधारणा करून जे उमेदवार विहीत संधीत वा विहीत कालावधीत सेवा प्रवेश परिक्षा उत्तीर्ण होणार नाहीत अशा उमेदवारांना सेवा जेष्ठता गमवावी लागेल अशी तरतुद केलेली आहे. म्हणजेच अशा उमेदवारांना कायम करता येत नाही. म्हणजे जे उमेदवार कार्यरत पदावर कायमच नाहीत अशा उमेदवारांना सेवेत पदोन्नती देता येणार नाही अशी तरतुद आहे. त्यानुसार कर्मचा-यांची जेष्ठता निश्चित करणेत यावी अशी तरतुद आहे.

तसेच संदर्भ क्र.७ मधील तरतुदी नुसार प्रत्यक्ष हजर दिनांक नमूद करणे व संदर्भ क्र.८ च्या पत्रानुसार स्पर्धा परिक्षा उत्तीर्ण कर्मचा-यांची परिक्षा दिनांका नुसार जेष्ठता दिनांक घेणेचे निर्देश आहेत तसेच, संदर्भ क्र.९ अन्वये शासनाकडून मागविण्यात आलेल्या मार्गदर्शनाच्या अधीन राहून उपरोक्त संदर्भ क्र.६ अन्वये केलेल्या अधिकार प्रदान आदेशाने प्रदान केलेले अधिकारानुसार, मी उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद जळगांव **वरिष्ठ सहाय्यक (लि.व.) या संवर्गात दिनांक ०१/०१/२०२५ रोजी कार्यरत कर्मचा-यांची तात्पुरती जेष्ठता सुची शासन अधिसुचना दिनांक २१ जून २०२१ मधे विहित केल्या प्रमाणे प्रसिध्द करण्यास मान्यता देत आहे.**

सदर **जेष्ठता सुची** आपले कार्यालयातील कार्यरत कर्मचारी यांचे निदर्शनास आणुन त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेण्यात यावी. तसेच या जेष्ठता सुची संदर्भात कर्मचा-यांचे काही आक्षेप असल्यास योग्य त्या पुराव्यासह लेखी आक्षेप दिनांक / /२०२५ अखेर या कार्यालयास सादर करणेत यावी

(स्नेहा पवार)
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र)**
**जिल्हा परिषद जळगांव**

**प्रत माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी.**

१) खाते प्रमुख, जिल्हा परिषद (सर्व)
२) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, (सर्व)
३) साप्रवि-आस्था-७/८ कार्यासन साप्रवि, जिल्हा परिषद, जळगाव.
४)माहिती व तंत्रज्ञान कक्ष जि.प. जळगाव.
२/- सदरची यादी जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर तात्काळ प्रसिध्द करण्यात यावी.